महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

---

वाचले :- १] सीएलआर ११७२/तीन/एक/के दिनांक १४ मार्च १९७३.

२] एफएलआर २४७६/६०/सी दिनांक २.१२.१९७८

३] सीएलआर ११८५/फ्लेवर/११-बी दिनांक १८ मे १९८५.

==================

परिपत्रक

क्रमांक :- सीएलआर ११९८/४६८७३/५-ब          मुंबई, ०९ नोव्हेंबर १९९८

या कार्यालयाच्या अनुक्रमांक १ च्या परिपत्रकाद्वारे राज्यातील सीएल-१ अनुज्ञप्तीधारक रंगविरहीत मद्य तयार करु शकतील तसेच देशी मद्य निर्मितीसाठी विदेशी मद्यात वापरल्या जाणा-या रंग, स्वाद यांच्या वापरावर निर्बंध लागू केले आहेत. अनुक्रमांक २ च्या परिपत्रका द्वारे कोलटार डाईज युक्त अर्क व स्वादाचा वापर करण्यावर निर्बंध लागू केले आहेत.

या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे की, काही देशी मद्य उत्पादक कॉफी व तत्सम स्वादाचा वापर करुन देशी मद्य निर्मिती करतात. कॉफी व तत्सम स्वादामुळे देशी मद्यास रम तसेच ब्रॅन्डी व व्हिस्कीच्या ब्रॅन्डप्रमाणे रंग येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही मद्य उत्पादक कॉफी / कॅफे ब्रॅन्डचा खप विदेशी मद्य म्हणून करत असल्याचे व त्यामुळे विदेशी मद्याच्या खपावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. देशी मद्यावरील व विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्काच्या दरात मोठी तफावत असल्याने विदेशी मद्य समजून देशी मद्य विक्री होत असल्यास त्यामुळे शासनाच्या महसुलावर अनिष्ट परिणाम होत आहे. सबब महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ या नियम ४७ मधील अधिकाराचा वापर करुन आदेश देण्यात येतात की, दिनांक १.१.१९९९ पासून सी एल-१ अनुज्ञप्तीधारकांनी देशी मद्यास रंग देणा-या कोणत्याही स्वाद, अर्काचा किंवा इतर कोणत्याही पदार्थाचा वापर करु नये.

काही देशी मद्य उत्पादक विदेशी मद्य निर्मितीत वापरले जाणारे अर्क व स्वाद यांचा वापर करुन जिन सदृश्य किंवा जिनच्या नावाचे किंवा अन्य विदेशी मद्याच्या नाव सदृश्य, डयुएट, इत्यादी देशी मद्याची निर्मिती करतात. साहजिकच त्यामुळे विदेशी मद्याच्या विक्रीवर व शासनाच्या महसुलावर वर नमूद

..२..

केल्याप्रमाणे ... अनिष्ट परिणाम होतो. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन राज्यातील सीएल-१ अनुज्ञप्तीधारकांना वर नमूद केलेल्या अधिकारांचा वापर करुन सूचना देण्यात येतात की, इंग्रजी नावे असलेले देशी मद्याच्या सर्व लेबलसची मंजूरी दिनांक १.१.९९ पासून रद्द करण्यात येत आहे. यापुढे देशी मद्यांना इंग्रजी नावे उदा. मँगो, ऑरेंज, लेमन, ड्युएट, जिंजर अशा कोणत्याही इंग्रजी नावांचा वापर करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. सबब सीएल-१ धारकांनी इंग्रजी नावाच्या देशी मद्याच्या लेबलसच्या मंजूरीसाठी अर्ज करु नये.

[ अजितकुमार जैन ]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१] आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना सस्नेह.
२] राज्यातील सर्व सीएल-१ अनुज्ञप्तीधारक.
३] सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
४] सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
५] सर्व सीएल-१ अनुज्ञप्ती धारकांचे प्रभारी अधिकारी.
६] या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
७] अभिलेख शाखा [५ प्रती]
८] कार्यासन क्रमांक ५-ब.

पंजवी ७.११.९८